# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

परिपत्रक क्र.१२०/२०२६

**विषय: पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यापीठ हिस्सा (University Share) ऑनलाईन भरणेबाबत..**

**संदर्भ: विद्यापीठ परिपत्रक क्र. ३०८/२०२५ दिनांक ०२ डिसेंबर, २०२५**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये विद्यापीठ हिस्सा (University Share) विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगीनमधून संशोधन केंद्राच्या परवानगीने विद्यापीठाकडे अदा करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आली होती. त्यास अनुसरून संशोधन केंद्राच्या परवानगीने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ हिस्सा (University Share) भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तथापि, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थ्यांना प्रवेश, संशोधक विद्यार्थ्यांना सेवानिवृत्त/राजीनामा, इ. कारणामुळे संशोधन मार्गदर्शक उपलब्ध नसणे, संशोधन कार्यपद्धती, पीएच्.डी ट्रॅकिंगमधील तांत्रिक समस्या, कोर्सवर्क, शुल्क यासारख्या अडचणीं निरसित करण्यासाठी सर्व विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली पुणे, अहिल्यानगर व नाशिक येथे अनुक्रमे दिनांक ०९ मे, ११ मे व १२ मे, २०२६ रोजी जिल्हानिहाय शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरांमध्ये विद्यार्थी विद्यापीठ हिस्सा (University Share) संबंधित संशोधन केंद्र व विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने दोनदा भरत असल्याचे उपस्थितांनी विद्यापीठाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

त्याअनुषंगाने मा.प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय परित्रकान्वये पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यापीठ हिस्सा (University Share) विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगीनमधून संशोधन केंद्राच्या परवानगीने विद्यापीठाकडे अदा करणेबाबतची सूचना अंमलात आणली असल्याने त्यांचेकडून आपल्या संशोधन केंद्राचे वार्षिक शुल्क घेताना यापुढे विद्यापीठ हिस्सा (University Share) घेण्यात येऊ नये.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/2963 )
दिनांक : 07/07/2026 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\General Circulars\Fees.docx